MHSN150008892020

( सुभाष विठ्ठल व्हनमाने विरुध्द तहसीलदार, आटपाडी–१ )

-----------------------------------------------------------------------------------

# <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २०/२०२०</u>
# <u>मधील निशाणी १६२ वरील आदेश</u>
## {जुना नियमित दिवाणी दावा क्रमांक २९/२०१५}

१. सदर अर्ज ति–हाईत इसम अर्जदार क्रमांक १ ते ११ यांनी सदर दाव्यामध्ये त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणेसाठी दाखल केलेला आहे.

२. ति–हाईत इसम अर्जदार यांचा अर्ज व वादी याचे निशाणी १६७ वरील म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. ति–हाईत इसम अर्जदार यांचे कथन असे आहे की, दावा मिळकतीच्या लगत व्यंकटेश मंदीराच्या उत्तर, पश्चिम आणि दक्षिण या तिन्ही बाजूस वडर समाजातील लोकांची घरे आहेत. वादी याने दावा मिळकतीच्या लगत असलेल्या व्यंकटेश मंदीराच्या खुल्या जागेमध्ये पूर्व व दक्षिण बाजूस अतिक्रमण करुन बेकायदेशीर बांधकाम सुरु केले आहे. ति–हाईत इसम अर्जदार व वडर समाजातील लोकांनी मे. तहसीलदार, आटपाडी व मे. जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे सदर वादी याचे बेकायदेशीर बांधकाम काढुन

घेणेबाबत आंदोलन करुन निवेदन दिले होते व त्यानुसार प्रतिवादी क्रमांक १ यांनी वादी यास तात्काळ ते अतिक्रमित बांधकाम काढ्डुन घेणेबाबत दिनांक १२/०१/२०१५ रोजी कळविले. परंतु, वादी याने त्याप्रमाणे कोणतीही कृती केली नाही. याउलट, वादी याने ती नोटीस आव्हानित करुन न्यायालयात प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. वादी याने ति–हाईत इसम अर्जदार यांच्या विरुध्द आटपाडी येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयामध्ये नियमित दिवाणी दावा क्रमांक १८/२०१६ हा दाखल केला असून, तो न्यायप्रविष्ठ असल्याची माहिती लपवून ठेवलेली आहे. ति–हाईत इसम अर्जदार यांनी उपस्थित केलेल्या तक्रारी निवेदनावरुन दावा मिळकतीसंबंधी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी कारवाई केलेली असताना सुध्दा वादी याने जाणीवपूर्वक ति–हाईत इसम अर्जदार यांना प्रस्तुत दाव्यातून वगळले आहे व वादी हा लबाडीने हुकूमनामा मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. ति–हाईत इसम अर्जदार यांचा दावा मिळकतीमध्ये हक्क, अधिकार व हितसंबंध आहे, त्यामुळे त्यांना सदर दाव्यामध्ये सामील करुन म्हणणे व कैफियत देऊन त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. सदर दाव्यामध्ये ति–हाईत इसम अर्जदार हे योग्य पक्षकार असून दाव्यातील गुंतागुंतीचा मुद्दा सोडवियास त्यांची मदत होणार आहे. त्यामुळे ति–हाईत इसम अर्जदार यांना सदर दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील करुन घेण्याची विनंती केलेली आहे.

४. वादीने त्याचे म्हणणे निशाणी १६७ वर दाखल करुन ति–हाईत इसम अर्जदार यांच्या अर्जातील सर्व कथने अमान्य केली आहेत. वादी याचे असे म्हणणे आहे की, ति–हाईत इसम अर्जदार यांचा दावा मिळकतीमध्ये

कोणताही हक्क, अधिकार व हितसंबंध नाही, तसेच ति–हाईत इसम अर्जदार यांचा दावा मिळकतीवर कब्जा नाही. ति–हाईत इसम अर्जदार हे दावा मिळकतीवरील वादीचे शांततापूर्ण कब्जे वहिवाटीस दांडगाव्याने हरकत करण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे त्याने त्यांच्या विरुध्द आटपाडी येथील दिवाणी न्यायालयामध्ये नि.दि.दा. क्रमांक १८/२०१६ हा निरंतर मनाई हुकूमासाठी दिनांक २१/०१/२०१६ रोजी वेगळा दावा दाखल केलेला आहे. त्या दाव्यात ति–हाईत इसम अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे व कैफियत दिली असून तो दावा सध्या प्रलंबित आहे. प्रतिवादी क्रमांक १ व २ म्हणजेच तहसीलदार व महाराष्ट्र सरकार यांनी दिनांक १२/०१/२०१५ रोजी वादी यास दावा मिळकतीवरील बाधकाम पाडणे संदर्भात बेकायदेशीर नोटीस दिल्यामुळे वादी याने त्यांच्या विरुध्द सदर मनाई ताकीदीचा दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये वादी याने शासकीय जागेत अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे अगर कसे हे ठरणार असून, सदर वादाशी ति–हाईत इसम अर्जदार यांचा कोणताही संबंध नाही. सदर दाव्यामध्ये वादी याने केवळ प्रतिवादी यांच्या विरुध्द निरंतर मनाईची दाद मागितलेली आहे व त्या व्यतिरिक्त अन्य कोणाविरुध्द दाद मागितलेली नाही. त्यामुळे ति–हाईत इसम अर्जदार हे सदर दाव्यामध्ये आवश्यक व जरुरीचे पक्षकार होत नाहीत. वादी हा कायद्याने दाव्याचा मालक असून, त्याच्या मर्जीविरुध्द ति–हाईत इसम अर्जदार यांना पक्षकार म्हणून सामील करुन घेता येणार नाही. ति–हाईत इसम अर्जदार यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. ति–हाईत इसम अर्जदार यांनी केवळ दाव्याचे काम प्रलंबित होण्याच्या हेतूने सदर खोटा अर्ज दाखल केला आहे.

त्यामुळे वादी याने सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

५. दोन्ही पक्षांची कथने, युक्तीवाद व अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी याने सदर दावा हा प्रतिवादी यांच्या विरुध्द दावा मिळकतीसंबंधी निरंतर मनाई हुकूम मिळणेकामी दिनांक १९/०१/२०१५ रोजी दाखल केलेला आहे. ति–हाईत इसम अर्जदार यांनी दावा मिळकतीच्या लगत व्यंकटेश मंदीराच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण या तिन्ही बाजूने वडर समाजाच्या लोकांची घरे असून, वादी हा व्यकटेश मंदीराच्या खुल्या जागेत पूर्व व दक्षिण बाजूस बेकायदेशीर अतिक्रमण करुन बांधकाम करत आहे व त्यामुळे त्यांनी त्याबाबत तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन दिले होते व त्यानुसार प्रतिवादी क्रमांक १ यांनी वादीस दावा मिळकतीवरील अतिक्रमित बांधकाम तात्काळ काढुन घेणेबाबत दिनांक १२/०१/२०१५ रोजी नोटीस देऊन कळविले होते व त्यामुळे ति–हाईत इसम अर्जदार यांचा दावा मिळकतीमध्ये हक्क, अधिकार व हितसंबंध आहे असे म्हटले आहे. परंतु, ति–हाईत इसम यांनी दावा मिळकत अथवा तथाकथित अतिक्रमण करुन बांधकाम करत असलेल्या जागेबाबत ति–हाईत इसम यांचा हक्क अथवा हितसंबंध असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

६. ति–हाईत इसम अर्जदार यांनी त्यांचे म्हणण्याच्या पृष्ठर्थ अभिलेखावर नि.दि.दा. क्रमांक १८/२०१६ मधील निशाणी १ व निशाणी २८ वरील अनुक्रमे वादपत्र व कैफियतची प्रमाणित प्रत दाखल केले असून, त्याचे

अवलोकनावरुन सदर दावा दाखल केल्यानंतर वादी याने दिनांक २१/०१/२०१६ रोजी ति–हाईत इसम अर्जदार हे दावा मिळकतीवरील वादी याच्या शांततामय ताबे कब्ज्यास हरकत करत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेकामी नि.दि.दा. क्रमांक १८/२०१६ हा दाखल केल्याचे दिसुन येते. सदर दाव्यामध्ये वादी याने ति–हाईत इसम अर्जदार यांचे विरुध्द दाखल केलेला नि.दि.दा. क्रमांक १८/२०१६ हा आटपाडी येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याची बाब दोन्ही पक्षकार यांना मान्य आहे. सबब, वादी याने सदर प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या विरुध्द दावा मिळकतीसंबंधी दावा दाखल केल्यानंतर, ति–हाईत इसम अर्जदार हे दावा मिळकतीवरील त्याच्या ताबे–कब्ज्यास हरकत व अडथळा करत असल्यामुळे वेगळा उपरोक्त नि.दि.दा. क्रमांक १८/२०१६ हा त्यांच्या विरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल करुन या पूर्वीच दाद मागितलेली आहे.

७. सदर दाव्यामध्ये वादी याने प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी दिनांक १२/०१/२०१५ रोजी दावा मिळकती मधील इमारतीचे बांधकाम पाडुन टाकण्यासंबंधी दिलेल्या नोटीसला आव्हान देऊन केवळ प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या विरुध्द निरंतर मनाई हुकूमाची दाद मागितलेली आहे. त्यामुळे सदर दाव्यातील वादातीत मुद्दयांचा व मागणीचा विचार करता सदर दाव्यामध्ये ति–हाईत इसम अर्जदार हे आवश्यक अथवा योग्य पक्षकार होत नाहीत. या शिवाय, वादी याने ति–हाईत इसम अर्जदार यांच्या विरुध्द या

पूर्वीच सदर दावा मिळकतीसंबंधी निरंतर मनाई हुकूम मिळणेकामी नि.दि.दा. क्रमांक १८/२०१६ हा वेगळा दाखल केलला आहे व त्यामध्ये ति-हाईत इसम अर्जदार यांनी दावा मिळकतीसंबंधी त्यांचे लेखी म्हणणे सुध्दा दाखल केलेले आहे व तो दावा न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे सदर दाव्यामध्ये ति-हाईत इसम अर्जदार हे आवश्यक अथवा योग्य पक्षकार होत नाहीत.

८. सदर दाव्यामध्ये ति-हाईत इसम अर्जदार यांनी व्यंकटेश मंदीराच्या लगत जागेत वादी बेकायदेशीर बांधकाम करत असल्याचे कथन केले आहे, परंतु ति-हाईत इसम अर्जदार यांनी सदर दावा मिळकतीसंबंधी अथवा लगतच्या मिळकतीसंबंधी त्यांचा काही हक्क, अधिकार व हितसंबंध असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. ति-हाईत इसम अर्जदार यांनी केवळ तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडे दावा मिळकतीवरील बांधकामासंबंधी निवेदन दिले यावरुन ते सदर दाव्यामध्ये आवश्यक अथवा योग्य पक्षकार होत नाहीत. सदर दाव्यामध्ये वादी याने प्रतिवादी क्रमांक १ व २ यांच्या विरुध्द केलेल्या मागणीचा विचार करता, ति-हाईत इसम अर्जदार हे सदर दाव्यामध्ये आवश्यक अथवा योग्य पक्षकार होत नाहीत. वादी हा डोमिनस लिटीस (dominus litis) असल्यामुळे व वादीने ति-हाईत इसम अर्जदार यांना यापूर्वीच आटपाडी येथील प्रलंबित नि.दि.दा. क्रमांक १८/२०१६ मध्ये प्रतिवादी म्हणून सामील केले असल्यामुळे, त्यांना पुन्हा या दाव्यामध्ये वादीच्या मर्जी विरुध्द प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे योग्य होणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीतत करण्यात येत आहे.

नियमित दिवाणी दावा क्रमांक २०/२०२०

(निशाणी १६२ वरील आदेश)

# आ दे श

१. ति–हाईत इसम अर्जदार क्रमांक १ ते ११ यांचा अर्ज निशाणी १६२ नामंजूर करण्यात येत आहे.

२. दोन्ही पक्षकार यांनी अर्जाचा खर्च आपआपला सोसावा.

DNYANESHWAR SITARAM PATALE

Digitally signed by DNYANESHWAR SITARAM PATALE
Date: 2025.03.21 17:40:35 +0530

विटा. (ज्ञानेश्वर सि. पताळे)

दिनांकः–२१/०३/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा.

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : S. P. Pethkar.
Court : Jt. Civil Judge Senior Division, Vita.
Judgment/Order signed by the Presiding Officer on : 21/03/2025.
Judgment/Order uploaded on : 24/03/2025.